पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. क्रीडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ८

**सभावृत्तांत**

दिनांक - १७/१२/२०१४ वेळ - दुपारी २.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १७/१२/२०१४ रोजी दुपारी २.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा. ननवरे जितेंद्र बाबा - सभापती**
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. सुपे आशा रविंद्र
४) मा. सौ.साळुंके सविता सुरेश
५) मा. बारणे निलेश हिरामण

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.बेंडे - प्रशासन अधिकारी, मा.पानसरे - क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.नगरसदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.५) महापौर चषक हॉलीबॉल स्पर्धा घेणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) स्क्वॅश कोर्टची दुरुस्तीबाबत - मा.सविता साळुंके, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) विद्यार्थी खेळाडूंसाठी बस सुविधा मिळणेबाबत - मा.आशा सुपे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) आंतरशालेय कला व गिर्यारोहण स्पर्धा २०१४-१५ आयोजित करणेबाबत - मा.किरण मोटे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) महापौर चषक राज्यस्तर कबड्डी स्पर्धा २०१४-१५ आयोजित करणेबाबत - मा.किरण मोटे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०) श्री संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल भोसरी येथील अथलेटिक ट्रॅक वैयक्तीक सरावासाठी १ दिवशी २ वेळा उपलब्ध करुन देणेबाबत - मा.आशा सुपे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्रं.११) हाफ किडो बॉक्सिंग या खेळाचा महापौर चषक क्रीडा स्पर्धेत समावेश करणेबाबत - मा.आशा सुपे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव.

---------

ठराव क्रमांक - ३४ विषय क्रमांक - १

दिनांक - १७/१२/२०१४ विभाग - क्रीडा

सुचक - मा.निलेश बारणे अनुमोदक - मा.किरण मोटे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/१७८/२०१४, दि.०२/१२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महानगरपालिकेच्या क्रीडा धोरणातील भाग १ ड शिष्यवृत्ती मधील ३ पान क्र.१८ प्रमाणे (आंतरराष्ट्रीय स्तरांवरील खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणे यामध्ये नमुद केलेप्रमाणे) **कु.वैष्णवी आनंदराव आंद्रे** हीची साऊथ कोरीया येथे होणा-या दि.१४/११/२०१४ ते १६/११/२०१४ या कालावधीमध्ये चौथ्या एशियन योगा स्पोर्टस् चॅम्पियनशिपकरीता निवड झाली असल्यामुळे सदर स्पर्धेसाठी उपस्थित राहणेकामी र.रु.७१,०००/- (अक्षरी र.रु.एक्काहत्तर हजार फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेबाबत मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३५ विषय क्रमांक - २

दिनांक - १७/१२/२०१४ विभाग - क्रीडा

सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.आशा सुपे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/१७९/२०१४, दि.०२/१२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महानगरपालिकेच्या क्रीडा धोरणातील भाग १ ड शिष्यवृत्ती मधील ३ पान क्र.१८ प्रमाणे (आंतरराष्ट्रीय स्तरांवरील खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणे यामध्ये नमुद केलेप्रमाणे) **कु.साक्षी गणेश महाले** हीची साऊथ कोरीया येथे होणा-या दि.१४/११/२०१४ ते १६/११/२०१४ या कालावधीमध्ये चौथ्या एशियन योगा स्पोर्टस् चॅम्पियनशिपकरीता निवड झाली असल्यामुळे सदर स्पर्धेसाठी उपस्थित राहणेकामी र.रु.७१,०००/- (अक्षरी र.रु.एक्काहत्तर हजार फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेबाबत मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६ विषय क्रमांक - ३

दिनांक - १७/१२/२०१४ विभाग - क्रीडा

सुचक - मा.किरण मोटे अनुमोदक - मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/५५४/२०१४, दि.०५/१२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने व साई संस्कार संस्था, चिंचवड, पुणे १९ यांच्या सहकार्याने माहे डिसेंबर २०१४ मध्ये श्री स्वामी विवेकानंद क्रीडांगण, महात्मा फुलेनगर, चिंचवड येथे अपंग तसेच मानसिक अपंग विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.५,६२,९००/- चे खर्चास मान्यता व सदर स्पर्धा अनुषंगाने विद्युत स्पिकर, माईक, जनरेटर व्यवस्था खर्च हा विद्युत विभाग, फ क्षेत्रीय कार्यालय व स्टेज, मंडप, टेबल, खुर्च्या व्यवस्था खर्च स्थापत्य विभाग फ क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.४,१२,९००/- हा खर्च क्रीडा निधी वार्षिक स्पर्धा क्रीडा कला या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३७ विषय क्रमांक - ४

दिनांक - १७/१२/२०१४ विभाग - क्रीडा

सुचक - मा.निलेश बारणे अनुमोदक - मा.किरण मोटे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/६९१/२०१४, दि.०८/१२/२०१४

विषय - क्रीडा विभागाकडील ई निविदा नोटीस क्र.१/३:२०१३-१४ भोसरी निवास जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजासाठी प्राप्त झालेले २ वर्षाचे लघुत्तम दर मंजूर करुन २ वर्षाचे कामाचे आदेश देणेबाबत....

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ३८ विषय क्रमांक - ५

दिनांक - १७/१२/२०१४

सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.आशा सुपे

संदर्भ : मा.सविता साळुंके, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव -

सन २०१४-१५ साली भरविणेत येणा-या महापौर चषक हॉलीबॉल स्पर्धा मोरवाडी प्रभाग क्र.२७ लक्ष्मण रेसिडेंसी समोरील मोकळया मैदानात घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३९ विषय क्रमांक - ६

दिनांक - १७/१२/२०१४

सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.आशा सुपे

संदर्भ : मा.सविता साळुंके, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव -

मोरवाडी प्रभाग क्र.२७ आयुक्त बंगल्या समोरील उद्यानात स्क्वॅश कोर्ट आहे. तथापि गेली अनेक वर्षे तेथील सोना बाथ स्टिम बाथ बंद आहे. वरील मजल्यावरील व्यायामशाळेत साहित्य नसल्याने स्क्वॅश कोर्ट मध्ये वरील सुविधा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४० विषय क्रमांक - ७

दिनांक - १७/१२/२०१४

सुचक - मा.आशा सुपे अनुमोदक - मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.आशा सुपे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव -

नेहरुनगर क्रीडा प्रबोधिनी शाळेच्या विद्यार्थ्यांना प्रवासाच्या दृष्टीकोनातून तसेच विद्यार्थी खेळाडूंची संख्या ही ५० इतकी असल्याने खेळाडूंच्या सरावासाठी नेहरुनगर क्रीडा प्रबाधिनी ते क्रीडा संकुल इंद्रायणीनगर मैदान या स्टॉप पर्यंत सकाळी ७.१५ वा.शाळेतून घेऊन जाणेस व सकाळी ९.३० वा.पुन्हा इंद्रायणीनगर मैदानावरुन शाळेस घेऊन येणे या करीता बस सुविधा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४१ विषय क्रमांक - ८

दिनांक - १७/१२/२०१४

सुचक - मा.किरण मोटे अनुमोदक - मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.किरण मोटे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आंतरशालेय ८ कला व गिर्यारोहण स्पर्धा आयोजित करणेस व त्यानुषंगाने विद्यार्थ्यांना द्यावयाचा खाऊ / बिस्किटे खरेदी, कला पुस्तिका छपाई, चित्रकला कागद खरेदी, फ्लेक्स बॅनर, ट्रॉफीज, निमंत्रण पत्रिका व प्रमाणपत्र छपाई इ.खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस तसेच प्रेक्षागृह भाडे, पी.एम.पी.एम.एल. बसभाडे, कामी येणा-या अंदाजे खर्च र.रु.३,९९,८५०/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदर क्रीडा निधी वार्षिक स्पर्धा क्रीडा कला या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस तसेच चित्रकला, लेझीम व गिर्यारोहण या स्पर्धा अनुषंगाने स्टेज मंडप, टेबल खुर्च्या इ.खर्च स्थापत्य विभाग, संबंधित प्रभाग व विद्युत स्पीकर, माईक व्यवस्था खर्च विद्युत विभाग, संबंधित प्रभागातून खर्ची टाकणेस मान्यता

देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४२ विषय क्रमांक - ९

दिनांक - १७/१२/२०१४

सुचक - मा.किरण मोटे अनुमोदक - मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.किरण मोटे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महाराष्ट्र राज्य कबड्डी असोशिएशन, पुणे जिल्हा कबड्डी असो. यांचे मान्यतेने जानेवारी / फेब्रुवारी २०१५ मध्ये पी.डब्लू.डी.ग्राऊंड, सांगवी पुणे येथे महापौर चषक राज्यस्तर कबड्डी स्पर्धा २०१५ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्च र.रु.३९,३८,१०८/- चे खर्चास मान्यता तसेच मैदान तयार करणे, स्टेज मंडप, टेबल खुर्च्या व्यवस्था खर्च र.रु.११,९२,०००/- हा स्थापत्य विभाग, संबंधित प्रभाग व विद्युत स्पीकर, माईक व्यवस्था खर्च र.रु.२,००,०००/- हा विद्युत विभाग, संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.२५,४६,१०८/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४३ विषय क्रमांक - १०

दिनांक - १७/१२/२०१४

सुचक - मा.आशा सुपे अनुमोदक - मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.आशा सुपे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव -

श्री संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल भोसरी येथील अथलेटिक्स ट्रॅकवर वैयक्तीक सरावासाठी प्रतिदिनी प्रतितास दर र.रु.१०/- असे निश्चित केले आहे. या दरात प्रतिदिनी २ वेळा १ - १ तास सरावासाठी देणेस तसेच सदर शुल्क आकारणी रोजचे रोज श्री संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल भोसरी येथेच करण्याची व्यवस्था करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४४ विषय क्रमांक - ११

दिनांक - १७/१२/२०१४

सुचक - मा.आशा सुपे अनुमोदक - मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.आशा सुपे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव -

हाफ किडो बॉक्सिग या खेळाचा नव्याने शालेय क्रीडा स्पर्धेत समावेश झाला आहे. सदर हाफ किडो बॉक्सिंग खेळाचा समावेश महापौर चषक क्रीडा स्पर्धेत करणेस मान्यता देणेकामी

मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : सविता साळुंके    अनुमोदक : मा.आशा सुपे

दहशतवादी संघटनेने पेशावरमध्ये शाळेवर केलेल्या आत्मघातकी हल्यात बळी गेलेल्या १३२ मुलांसह १४१ जणांना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभेराहून श्रध्दांजली अर्पण केली )

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( ननवरे जितेंद्र बाबा )**
**सभापती**
क्रीडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१०१०/२०१४
दिनांक : १८/१२/२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.